

## डब्बू आसवानी यांनी राबविलेले उपक्रम कौतुकास्पद -शेखर सिंह

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in | सोमवार दिनांक 20/01/२०२५ | METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 25 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# पुण्याचे दादा अजित दादाच

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुण्याचे पालकमंत्री पद कोणाकडे जाते याकडे सर्व पुणेकरांचे लक्ष लागले होते पुण्याचे पालकमंत्री म्हणून भाजपचे चंद्रकांत दादा पाटील यांना पालकमंत्री पद द्यावे अशी भाजपने मागणी होत होती परंतु पुण्याचे पालकमंत्री पद महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा यांच्याकडेच राहिले आहे त्यामुळे पुण्याचे दादा अजित दादाच असे म्हणणे योग्य ठरले**



राज्य सरकारमधील मंत्र्यांकडे एखाद्या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद दिलं जातं. नावातच 'पालक' शब्द असलेल्या या मंत्रिपदाची जबाबदारीही त्यातून पूर्णपणे स्पष्ट होते.एखाद्या विशिष्ट जिल्ह्याचं जणू पालकत्वच या मंत्र्याकडे असते. मग त्या जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती असो किंवा कुठलीही योजना असो किंवा लोकोपयोगी कोणतेही काम असो, किंवा अगदी शासकीय समारंभ असो, पालकमंत्री या सगळ्यांच्या केंद्रस्थानी असतो. या पदामागील व्यवस्थेचा म्हणून हेतू सांगायचा झाल्यास, असं सांगता येईल की, जबाबदारी दिलेल्या जिल्ह्याच्या विकासावर देखरेख ठेवण्याचं काम पालकमंत्रिपदावरील व्यक्तीची असते. जिल्ह्याचं प्रशासन नीट आणि कार्यक्षमतेनं कार्यरत आहे ना, हे पालकमंत्री पाहत असतात. लोकनियुक्त सरकार आणि जिल्हा प्रशासन यांच्यातील महत्त्वाचं धागा म्हणूनही पालकमंत्रिपदाकडे पाहिलं जातं.महाराष्ट्र राज्यातील 42 मंत्र्यांपैकी 34 मंत्र्यांनाच पालकमंत्री पद मिळाली आहेत. यामध्ये धनंजय मुंडे, भरत गोगावले, योगेश कदम आणि ईतर मंत्र्यांना एकाही जिल्ह्याचं पालकमंत्रिपद नाही.

पुण्याच्या पालकमंत्रिपदावर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यात रस्सीखेच पाहायला मिळत होती. मात्र, ते अजित पवारांकडं गेलं.रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर मंत्री भरत गोगावले आणि अदिती तटकरे यांच्यात रस्सीखेच होती. त्यात आदिती तटकरे यांना पालकमंत्रिपद देण्यात आलं बीडमध्ये धनंजय मुंडे की पंकजा मुंडे पालकमंत्री होणार याकडं सर्वांचंच लक्ष लागलं होतं. मात्र दोघांचाही पत्ता कट होऊन अजित पवारांकडे बीडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली. छत्रपती संभाजीनगरमध्ये संजय शिरसाट की अतुल सावे यापैकी कोणाच्या गळ्यात पालकमंत्री पदाची माळ पडणार अशी चर्चा होती. त्यात छत्रपती संभाजीनगरचं पालकमंत्री पद संजय शिरसाट यांना मिळालं आहे. तर सावे यांना नांदेडचं पालकमंत्रिपद देण्यात आलं. मुंबईच्या पालकमंत्रिपदावरुन शिवसेना आणि भाजपमध्ये स्पर्धा पाहायला मिळत होती. कारण आगामी काळात मुंबई महापालिका निवडणुका होणार आहेत. त्यात मुंबई शहराचे पालकमंत्रिपद हे एकनाथ शिंदे यांना दिले गेले. तर मुंबई उपनगराचे पालकमंत्रिपद हे आशिष शेलार आणि मंगल प्रभात लोढा यांना देण्यात आले.

## पालकमंत्र्यांची संपूर्ण यादी

- गडचिरोली – देवेंद्र फडणवीस
- ठाणे – एकनाथ शिंदे
- मुंबई शहर – एकनाथ शिंदे
- पुणे व बीड – अजित पवार
- नागपूर – चंद्रशेखर बावनकुळे
- अमरावती – चंद्रशेखर बावनकुळे
- अहमद नगर – राधाकृष्ण विखे-पाटील
- वाशिम – हसन मुश्रीफ
- सांगली – चंद्रकांत पाटील
- नाशिक – गिरीश महाजन
- पालघर – गणेश नाईक
- जळगाव – गुलाबराव पाटील
- यवतमाळ – संजय राठोड
- मुंबई उपनगर - ॲड. आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा (सह-पालकमंत्री)
- रत्नागिरी – उदय सामंत
- धुळे – जयकुमार रावल
- जालना – पंकजा मुंडे
- नांदेड – अतुल सावे
- चंद्रपूर – अशोक उईके
- सातारा – शंभूराज देसाई
- रायगड – आदिती तटकरे
- लातूर – शिवेंद्रसिंह भोसले
- नंदुरबार – माणिकराव कोकाटे
- सोलापूर – जयकुमार गोरे
- हिंगोली – नरहरी झिरवाळ
- भंडारा – संजय सावकारे
- छत्रपती संभाजीनगर – संजय शिरसाट
- धाराशिव – प्रताप सरनाईक
- बुलढाणा – मकरंद जाधव (पाटील)
- सिंधुदुर्ग – नितेश राणे
- अकोला – आकाश फुंडकर
- गोंदिया – बाबासाहेब पाटील
- कोल्हापूर – प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ (सह-पालकमंत्री)
- गडचिरोली - ॲड.आशिष जयस्वाल (सह-पालकमंत्री)
- वर्धा – डॉ. पंकज भोयर
- परभणी – मेघना बोर्डीकर

# सैफ अली खान वर हल्ला करणारा बांगलादेशी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सैफ अली खान यांच्या घरात घुसून त्यांच्यावर चाकूने तब्बल सहा वार करणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात आला आहे. हल्ला झाल्यानंतर पोलीस त्याच्या शोधात होते परंतु तीन दिवस उलटूनही सदर आरोपी हा पोलिसांच्या हाती लागत नव्हता परंतु आता सदर आरोपी पोलिसांच्या ताब्यात असल्याचे सांगण्यात येत आहे.16 जानेवारी रोजी चित्रपट अभिनेते सैफ अली खान यांच्या घरात घुसून त्यांच्यावर हल्ला करणारा आरोपी यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी हा बांगलादेशी असून एका हाउसकीपिंग एजन्सी मध्ये काम करणारा असल्याचे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले आहे. त्याला मुंबई येथे अटक केली असून याबाबतची अधिक माहिती मुंबई पोलीस चे दीक्षित गेडम यांनी दिली आहे.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 20/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# डायमंड पार्क्स,लोहगाव,प्रजासत्ताक दिनाच्या धमाका ऑफर

## समवेत जबरदस्त मजा,जबरदस्त खाना देण्यास सज्ज.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे, जानेवारी 2025 – आय एस ओ 9001:2025 प्रमाणित पुण्याचे प्रमुख एंटरटेनमेंट डेस्टिनेशन, डायमंड पार्क्स, लोहगाव आपल्या "जबरदस्त मझा, जबरदस्त खाना" थीम सह प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आनंद आणि उत्साह पसरविण्या साठी सज्ज आहे. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या पार्टी च्या यशस्वी आयोजनानंतर नवीन वर्षातील पहिला उत्सव 'प्रजासत्ताक दिनाच्या रूपाने' डायमंड पार्क्स मध्ये साजरा करण्यात येत आहे.**

दि. २५ आणि २६ जानेवारी रोजी साजर्या करण्यात येणाऱ्या 'प्रजासत्ताक धमाका ऑफर' मध्ये गेस्ट्स ना अमर्याद वॉटर पार्क, आणि ऍडव्हेंचर ऍक्टिव्हिटीज सोबत चवदार लंच चा आनंद सुद्धा लुटता येईल आणि स्नॅक्स कुपन सुद्धा मिळेल, ते सुद्धा ऑफर च्या कमी किंमतीत. डायमंड पार्क्स, लोहगाव विविध ऑफर्स च्या माध्यमातून मनोरंजन देण्या बरोबरच नेहमीच देशप्रेमाच्या जाणीवेतुन काम करत आली आहे.

त्यातुनच पोलीस आणि डिफेन्स मधील कर्मचाऱ्यांसाठी वर्षभर सुरु रहाणार्या पोलीस ऑफर व डिफेन्स ऑफर देण्यात येत आहेत.




डायमंड पार्क्स, लोहगाव ट्रिप व फॅमिली आऊटिंग साठी नेहमीच पुणेकरांची पसंती राहिली आहे, त्याचे कारण डायमंड पार्क्स मध्ये सर्वांसाठी असणारी आकर्षणे. वॉटर पार्क मध्ये असणारी २० पेक्षा जास्त आकर्षणे लहान मुलांसाठी आणि मोठयांसाठी सेपरेट केली आहेत. दोन्ही ठिकाणी फरशी नसल्यामुळे आणि उथळ पाण्याच्या पातळी मुळे वॉटर पार्क अतिशय सुरक्षित आणि आनंददायी बनले आहे.

त्या बरोबर अधिक सुरक्षिततेसाठी ठिकठिकाणी लाईफ गार्डस देखील उपस्थित असतात.

वॉटर पार्क्स सारख्या च ऍडव्हेंचर पार्क्स मध्ये येणाऱ्या २० पेक्षा जास्त ऍडव्हेंचर एटिव्हिटीज सुद्धा सुरक्षित आणि लहान व मोठयांसाठी वेगळ्या ठिकाणी आहेत ज्यांच्यावर प्रशिक्षित मार्शल्स देखरेख ठेवतात.

या बरोबर उत्कृष्ठ चव आणि दर्जेदार सेवेसाठी ओळखले जाणारे हिलटॉप मल्टिक्यूज़ीन रेस्टोरंट देखील गेस्ट्स चे आवडते ठिकाण आहे. प्रजासत्ताक दिन धमाका ऑफर ही फक्त सुरुवात आहे, या नंतर येणारे व्हेलेंटाईन डे आणि लै भारी होळी ४.० हे उत्सव देखील नक्कीच लक्षवेधी ठरणार. प्रजासत्ताक दिन धमाका ऑफर च्या अधिक तपशील आणि बुकिंगसाठी, www.diamondparks.com ला भेट द्या किंवा 7720006622 वर कॉल करा.

# राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांना दिले शाळा भेटीचे निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : राज्याचे शिक्षण आयुक्त सचिद्र प्रताप सिंह यांनी सर्व शिक्षण संचालक, सहसंचालक व उपसंचालक यांना शनिवारचे औचित्य साधून "आनंददायी शनिवार " या उपक्रमासह, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत शाळांना भेटी देण्याचे शुक्रवारी सायंकाळी निर्देश दिले होते.

शिक्षण आयुक्त श्री सचिद्र प्रताप सिंह यांनी स्वतः देखील आज शनिवारी दिनांक 18/01/2025 रोजी पानशेत व परिसरातील शाळांना अचानक भेटी दिल्या त्यांच्या समवेत प्राचार्य जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था पुणे, शिक्षणाधिकारी प्राथमिक पुणे व अन्य अधिकारी देखील उपस्थित होते.

पानशेत समूह शाळा भेटीदरम्यान विद्यार्थी-शिक्षक यांच्याशी संवाद साधला. विद्यार्थ्यांचे आनंददायी शनिवार अंतर्गत नाट्यीकरण, कविता, नृत्य, भाषा व गणित खेळ पाहिले. स्वतः शिक्षण आयुक्त तब्बल 40 मिनिटे विद्यार्थ्यांमध्ये उभे राहून विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून संवाद साधत होते. विद्यार्थ्यांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना त्यांनी आयएस या परीक्षेत उत्तीर्ण कसे झाले याचा प्रेरणादायी प्रवास उलगडून सांगितला. शाळांमध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

तसेच राज्यस्तरावरील सर्वच अधिकाऱ्यांनी देखील राज्यातील विविध भागातील आज अचानक शाळांना भेटी दिल्या. या अधिकाऱ्यांनी शाळांच्या भेटीदरम्यान शिक्षण विभागामार्फत




राबविण्यात येणाऱ्या आनंददायी शनिवार, शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, शाळेत दिल्या जाणाऱ्या आहाराची स्थिती पाहिली. इयत्ता दहावी व बारावीचे वर्ग असणाऱ्या शाळातील विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त अभियानाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यालयास सुट्टी असल्याने शनिवारी राज्यातील वरिष्ठ अधिकारी शाळांमध्ये भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये रममान झाल्याचे चित्र दिसून आले.

# वाकडमध्ये तीन साथीदारांवर गुन्हा दाखल

पिंपरी : 'गाडी हळू चालव', असे म्हटल्याने टेम्पोचालक व त्याच्या तीन साथीदारांनी पादचाऱ्याला मारहाण करून कटरने वार केले. वाकड येथील छत्रपती चौकात बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली.प्रफुल्ल विवेक वैद्य (३१, रा. कस्पटे वस्ती, वाकड) यांनी शुक्रवारी (दि. १७) वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी टेम्पोचालक आणि त्याच्या तीन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला.फिर्यादी वैद्य रस्त्याच्या कडेला मित्राची वाट पाहात थांबले होते. त्यावेळी संशयित टेम्पो भरधाव वेगात घेऊन फिर्यादी प्रफुल्ल यांच्या दिशेने आला. त्यामुळे वैद्य यांनी टेम्पो चालकाला थोडा सावकाश चालव, असे म्हटले. या कारणावरून चालकाला राग आला. 'माझा टेम्पो आहे, मी कसाही चालवेन', असे तो म्हणाला. त्यानंतर टेम्पोमधून तीन मुले उतरली. 'रागाने काय बघतोस', असे ते प्रफुल्ल यांना म्हणाले. 'याला धर, मारून टाकू', असे म्हणून त्यांनी शिवीगाळ व मारहाण केली. टेम्पो चालकाने कटरने प्रफुल्ल यांच्यावर वार केले. लोखंडी कड्याने डोक्यात मारहाण करून जखमी केले.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 20/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मेस्ट्रो रिअलटेक आणि कृष्णव डेव्हलपर्स यां भागीदारी

## 'प्रोजेक्ट कोडनेम गोल्डनजेजुरी ' चे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : मेस्ट्रो,रिअलटेक एक प्रसिद्ध रणनीतिक रिअल इस्टेट भागीदार, Krishnav Developers सोबत भागीदारी करत अत्यंत प्रतीक्षित *'प्रोजेक्ट कोडनेम GOLDEN JEJURI'* लाँच करण्यासाठी उत्सुक आहे. हा प्रकल्प जेऊरीच्या सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि शांत परिसरात स्थित असून वारसा, शांतता आणि आधुनिक जोडणी यांचे संमिश्रण करण्याचे आश्वासन देतो, जे विवेकी गुंतवणूकदार आणि घरमालकांसाठी आदर्श ठरेल.**

आयकॉनिक जेऊरी मंदिराजवळ, ज्याचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहे, *प्रोजेक्ट कोडनेम GOLDEN JEJURI* हे वारसा आणि निसर्गाच्या समृद्धतेच्या सान्निध्यात राहण्याची अनोखी संधी प्रदान करते. हा प्रकल्प १६ एकरांमध्ये पसरलेला असून १९६ उत्कृष्ट नियोजित एनए बंगल्याचे प्लॉट्स समाविष्ट आहेत, जे १,००० ते ४,००० चौरस फूट पर्यंत उपलब्ध आहेत. हे प्लॉट तात्काळ ताब्यात घेण्यासाठी तयार असून, गुंतवणूकदारांसाठी या क्षेत्राच्या वाढत्या मूल्यावर भांडवल उभारण्याची अपूर्व संधी उपलब्ध करून देतात. *FSI (Floor Space Index)* १.८५ पर्यंत असून, प्रकल्पाचा ताबा जानेवारी २०२७ पर्यंत अपेक्षित आहे, ज्यामुळे सांस्कृतिक समृद्धतेसह आधुनिक जीवनशैलीचे प्रतीक म्हणून हा प्रकल्प उदयास येणार आहे.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे तो प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळापासून केवळ १० किलोमीटर अंतरावर आहे. हा विमानतळ प्रादेशिक जोडणीला चालना देऊन या भागातील रिअल इस्टेट मूल्य वाढवणार आहे. नाझरे धरण, जेऊरी रेल्वे स्टेशन आणि मोरेगाव गणपती मंदिरासारख्या महत्त्वाच्या सांस्कृतिक स्थळांच्या जवळपास असल्यामुळे हा प्रकल्प शांत, परंतु चांगल्या जोडणीसाठी आदर्श जीवनशैलीचे ठिकाण ठरतो. *प्रोजेक्ट कोडनेम GOLDEN JEJURI* मध्ये आधुनिक कुटुंबांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ३० हून अधिक सुविधा उपलब्ध आहेत. यात भव्य प्रवेशद्वार आणि सुरक्षा कॅबिन, स्विमिंग पूल, क्लबहाउस, प्रेक्षागृह, ओपन जिम, जॉगिंग ट्रॅक, टेनिस कोर्ट आणि प्रॅक्टिस बास्केटबॉल कोर्ट यांचा समावेश आहे. कुटुंबांसाठी




मुलांचे खेळाचे क्षेत्र, टॉडलर झोन आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी गॅझेबो उपलब्ध आहेत. आकर्षक लँडस्केपिंग, पाण्याचे कारंजे आणि मंदिर प्रकल्पाचे सौंदर्य वाढवतात. तसेच, इव्हेंट लॉन, स्टेज, परगोला सीटिंग, आणि मैदानी अभ्यास क्षेत्र यामुळे हा प्रकल्प एकत्रितपणे विश्रांती, मनोरंजन, आणि सांस्कृतिक समृद्धता प्रदान करणारे ठिकाण बनतो. *Maestro Realtek* चे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक नितीन गुप्ता म्हणाले, "Krishnav Developers सोबतच्या या प्रकल्पासाठीची भागीदारी आमच्या अपवादात्मक रिअल इस्टेट सोल्युशन्स प्रदान करण्याच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे. *प्रोजेक्ट कोडनेम GOLDEN JEJURI* हे आमच्या धोरणात्मक स्थानाच्या फायद्यांसह जीवनशैली-केंद्रित सुविधांचे संमिश्रण आहे, जे गुंतवणूकदारांसाठी आणि दुसऱ्या घर खरेदीदारांसाठी आदर्श आहे." यावर Krishnav Developers चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश संभाजी साठे म्हणाले, "Krishnav Developers मध्ये आम्ही आधुनिक कुटुंबांच्या आकांक्षांना अनुकूल असलेली आणि वारशाशी जुळणारी ठिकाणे निर्माण करण्याचे स्वप्न बाळगतो. *प्रोजेक्ट कोडनेम GOLDEN JEJURI* हेच स्वप्न प्रत्यक्षात आणणारा प्रकल्प आहे, जो शांत वातावरण, उत्कृष्ट जोडणी, आणि मजबूत पायाभूत सुविधा प्रदान करतो. हा प्रकल्प केवळ प्लॉट्स विक्रीबाबत नाही, तर भूतकाळ आणि भविष्य यांना जोडणारी जीवनशैली निर्माण करण्याचा आहे." जेऊरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेत विशेष स्थान मिळवून आहे. "खंडोबाचे जेऊरी" म्हणून ओळखले जाणारे हे ठिकाण दरवर्षी हजारो भाविकांना आकर्षित करते. *प्रोजेक्ट कोडनेम GOLDEN JEJURI* चे उद्घाटन या समृद्ध वारशाला आधुनिक शहरी नियोजनासह समाकलित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामुळे या प्रदेशाची नैसर्गिक सुंदरता आणि ऐतिहासिक महत्त्व टिकवून ठेवत आर्थिक आणि निवासी विकासासाठी नवीन मार्ग खुल्या होतील.

*Maestro Realtek विषयी:* नितीन गुप्ता यांनी स्थापन केलेली Maestro Realtek ही कंपनी रिअल इस्टेट व्यवसायासाठी प्रभावी उपाय प्रदान करणारी अग्रगण्य कंपनी आहे. १८ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या नितीन गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली कंपनी ग्राहकांना परिणामकारक सेवा देण्यासाठी वचनबद्ध आहे.

***अधिक माहितीसाठी भेट द्या:***

[https://maestrorealtek.com/](https://maestrorealtek.com/)

# काळेवाडीत जुगाऱ्यांना दणका; जुगार खेळणाऱ्या सात जणांवर गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जुगार अड्ड्यावर कारवाई केली. तीन पत्त्यांचा जुगार खेळत असलेल्या सात जणांवर गुन्हा दाखल केला. काळेवाडी येथील तापकीरनगर झोपडपट्टीत गुरुवारी (दि. १६) सायंकाळी पावणेसहाला ही कारवाई केली. कालिदास ज्ञानेश्वर दिवसे (४४, रा. गावडे भोईर आळी, चिंचवडगाव), नथुराम शंकर बनकर (५६, रा. औंध, पुणे), सुरज भास्कर पाटील (३१, रा. थेरगाव), देवराम आत्माराम रागपसरे (३३, रा. आनंदनगर, चिंचवड), सुनील मधुकर ढोकळ (५४, रा. पाचपीर चौक, काळेवाडी), कबीर मुनीर सय्यद (४५, रा. विठ्ठलनगर झोपडपट्टी, नेहरूनगर, पिंपरी), अक्षय सुरेश गुंजेकर (३१, रा. भारतमाता चौक, काळेवाडी) यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस यांनी दिलेल्या माहितीनुसार, काळेवाडी येथील भारतमाता चौकात जुगार अड्डा सुरू असल्याबाबत पथकाला माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली. संशयित हे २० हजार रुपयांसह तीन पत्ती जुगार खेळताना मिळून आले.

चित्र -गौतम दिवार



# डब्बू आसवानी यांनी राबविलेले उपक्रम कौतुकास्पद -शेखर सिंह

## हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : डब्बू आसवानी यांनी राबविलेले हे उपक्रम कौतुकास्पद असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी म्हंटले आहे. डब्बू आसवानी राबवित असलेल्या हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमास आयुक्त शेखर सिंह यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, आपल्या दैनिंदिन आयुष्यात खेळ हे महत्वाचे आहे. युवांसोबतच वयस्कर व्यक्तींनी देखील यामध्ये सहभाग घेणे आवश्यक आहे, अशाच प्रकारचे उपक्रम लोकप्रतिनिधींनी आपल्या पिंपरी चिंचवड शहरात राबविले पाहिजे, अशी प्रतिक्रिया शेखर सिंह यांनी दिली.

सदर उपक्रम २९ डिसेम्बर ते २३ फेब्रुवारी पर्यंत दर रविवारी पिंपरी येथील ओपन लॉन येथे राबविले जात आहे.

फिट राहा, आनंदी राहा व संपर्कात राहा, असा संदेश देत हा उपक्रम साजरा होत आहे.

याउपक्रमाबाबत डब्बू आसवानी यांच्याशी अधिक माहिती घेतली असता, ते म्हणाले, लहान मुलांसह वयस्कर व्यक्तींनी आनंदी राहावे, विविध खेळाचा आनंद घ्यावा, याकरिता या हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमाची सुरुवात करण्यात आली




आहे. या उपक्रमात लहान मुलांसाठी व युवक-युवतींसाठी तसेच वयोवृद्ध व्यक्तीसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.

मनुष्याचे जीवन निरोगी राहण्यासाठी, आयुष्यात खेळांचा समावेश असणे आवश्यक असते, लहान-मोठे वृद्ध सर्वांच्याच जीवनात विविध खेळाचे अनन्य साधारण महत्व असते, आणि यामुळेच पिंपरी चिंचवड शहरातील माजी उपमहापौर हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांनी पिंपरी मध्ये हॅप्पीनेस स्ट्रीट नावाचे उपक्रम राबवित आहेत. या उपक्रमाच्या अंतर्गत ४० विविध खेळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या उपक्रमात सर्व वयोगटातील नागरिकांचा सहभाग पाहावयास मिळत आहे. म्युझिक, डान्स, विविध खेळांच्या स्पर्धा यामध्ये केरम, बुद्धिबळ, रनिंग, सायकलिंग, जॅमर्स बोवलिंग, लाईव्ह शो, असे अनेकोनेक उपक्रम या हॅप्पीनेस स्ट्रीट अंतर्गत राबविले जात आहे.

# स्वामित्व योजनेअंतर्गत आयोजित कार्यक्रमात १९१ लाभार्थ्यांना सनद वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत स्वामित्व योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय सनद वाटप कार्यक्रम जिल्हा परिषद येथे आयोजित करण्यात आला; यावेळी १९१ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात सनद वाटप करण्यात आल्या.

यावेळी आमदार सुनील कांबळे, हेमंत रासने, अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अति. संचालक भूमि अभिलेख आनंद भंडारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, भूमि अभिलेखचे उपसंचालक राजेंद्र गोळे आदी उपस्थित होते.

जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर आयोजित केलेल्या स्थानिक कार्यक्रमांमध्ये प्रॉपर्टी कार्डचे प्रत्यक्ष वितरण करण्यात आले. पुणे जिल्हातील १३ तालुक्यामधील १ हजार १४९ गावांना स्वामीत्व योजना लागू करण्यात आली असून ड्रोन फ्लॉयींगचे काम पुर्ण झाले आहेत. ७८२ गावांच्या सनद व मिळकतपत्रीका तयार करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ७२ गावात सनद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मोहोळ म्हणाले, केंद्रसरकारच्या विविध लोकल्याणकारी योजना तसेच स्वामित्व योजनेपासून नागरिकांना होणाऱ्या लाभाविषयी माहिती दिली. भंडारी यांनी प्रस्ताविकात स्वामित्व योजनेची माहिती देऊन सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली. जिल्हाधिकारी डुडी यांनी उपस्थिताचे आभार मानले.

महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत राज मंत्रालय, भारत




सरकारयांच्यावतीने स्वामित्व योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेद्वारे गावातील मिळकतधारकाला मालमत्ता पत्रक उपलब्ध करुन देताना संबंधित मिळकतधारकाला 'दस्तऐवजाचा हक्क' प्रदान करणेत येत आहेत.

या योजनेमध्ये ड्रोन द्वारे हवाई मॅपींग करून गावठाणातील मिळकतींचे नकाशे तयार करण्यात येतात. या नकाशांचे ग्राऊंड ट्रथींग करून हक्क चौकशीअंती मिळकतींच्या सनदा व मिळकतपत्रिका तयार करण्यात येतात. कार्यक्रमापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी दुरदृष्यप्रणाली नागरिकांशी संवाद साधला. स्वामित्व योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या निवासी मालमत्तेच्या मालकीबाबत मालमत्ता विषयक कागदपत्र उपलब्ध झाल्याने ग्रामीण क्षेत्रातील लोकांना सक्षम बनविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते आज ६५ लाख मालमत्ता पत्रकांचे आभासीपद्धतीने लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले

# सावकारी जाचाला कंटाळून कुटुंबाचा सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : व्याजाने घेतलेल्या पैशांची परतफेड करून आणि जमीन लिहून दिल्यानंतरही वाढीव पैशांसाठी सावकारांनी तगादा लावल्याने एकाच कुटुंबातील तिघांनी झाेपेच्या गाेळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. वडिलांनी मुलाचा गळा दाबून खून केल्यानंतर दाम्पत्याने गळफास घेतला. त्यामध्ये महिलेचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी चिखली येथे घडली. याप्रकरणी पाेलिसांनी तीन सावकारांना अटक केली आहे.

धनराज वैभव हांडे (वय १०) असे खून झालेल्या मुलाचे नाव असून, शीतल वैभव हांडे (वय ४१ ) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. वैभव मधुकर हांडे (वय ५०, सर्व रा. सोनावणे वस्ती, चिखली) हे बचावले. त्यांनी याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संतोष पांडुरंग कदम (वय ४८, रा. ताथवडे), संतोष दत्तात्रय पवार (वय ४९, रा. कुदळवाडी, चिखली) आणि जावेद मेहबूब शेख (वय ३६, रा. मोई, खेड) यांना अटक केली आहे. वैभव यांच्याविरोधात मुलाच्या खूनप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे चिखली पाेलीस ठाण्याचे वरिष्ठ पाेलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी सांगितले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968